**Anekant Education Society's**

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

**Displayed on :05/09/2020** Notice No. 26

## भारत सरकारची (सेंट्रल सेक्टर) महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षण घेणा—या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सन २०२०—२०२१

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी/मार्च २०२० मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नविन मंजूरीचे आणि प्रथम, द्वितीय व तृतीय नुतनीकरणाचे (Fresh, 1st , 2nd , 3rd & 4th Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

**केंद्रशासनामार्फत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० आहे.**

ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या **Renewal Top 20th Percentile Merit List** मध्ये समावेश आहे, अशाच विद्यार्थ्यांचे नवीन मंजूरी (Fresh) शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन (Online) भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्या यादीत नाव असेल अशाच विद्यार्थ्यांनी फॉर्म भरावयाचा आहे व सदर विद्यार्थ्यांनी दुस—या कोणत्याही शिष्यवृत्तीचा फॉर्म भरलेला नसावा.

किमान पात्रता व अटी :

१. अर्जदार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.
३. अर्जदाराचे/त्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा अधिक नसावे.
४. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका

TULJARAM CHATURCHAND COLLEGE * BARAMATI

अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.

५. या शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना बॅक खात्यामध्ये केंद्र शासनाच्या कडून परस्पर जमा करण्यात येणार असल्यामुळे विद्यार्थ्यांनी जवळच्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेत खाते उघडून त्याचा खाते क्रमांक, आय.एफ.एस.सी., एमआयसीआर कोड अर्जामध्ये अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे. अन्यथा सादर केलेला अर्ज शिष्यवृत्तीस पात्र ठरणार नाही. तसेच नमूद बॅक खाते क्रमांक हा त्याच्या आधार कार्ड क्रमांकाशी संलग्न (Link) असणे अत्यावश्यक आहे.

६. खाते क्रमांक व इतर बॅक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहील. विद्यार्थ्याचा बॅक खाते क्रमांक मेजर असावा व जाईंट खाते नसावे. स्टेट बॅक ऑफ इंडियाने विद्यार्थ्यांना शून्य रकमेवर बॅक खाते उघडण्यासाठी खास सवलत दिलेली आहे.

७. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटीचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती रद्द केली जाईल/वसुल केली जाईल.

- <u>शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Renewal)</u> :

१. शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठी मागील वर्षाच्या परीक्षेत किमान ५०% किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

२. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीच्या प्रथम, द्वितीय तृतीय व चतुर्थ नूतनीकरणाकरिता (Fresh (2020-21), 1st (2019-20), 2nd (2018-19), 3rd (2017-18), & 4th (2016-17) Renewal) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा.

३. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज पुढील कार्यवाहीसाठी विचारात घेतले जाणार नाही.

४. नुतनीकरणाच्या अर्जासोबत मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत व राष्ट्रीयकृत बॅक खाते पासबुकाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत सोबत जोडावी.

५. विद्यार्थ्याच्या अर्जासोबत आधार कार्ड असणे आवश्यक आहे. तसेच त्याचा आधारक्रमांक हा त्याच्या बॅक खात्याशी संलग्न असणे आवश्यक आहे.

- <u>नविन मंजूरीचे आणि प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ नूतनीकरणासाठी (Fresh1st , 2nd , 3rd</u> & 4th Renewal) :

१. नवीन मंजूरीसाठी <u>(Fresh)</u> आणि नूतनीकरण **1st, 2nd** 3rd & 4th **Renwal** **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

नवीन मंजूरीच्या अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :

१. अर्जावर विद्यार्थ्यांचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो).

२. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२० गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत.

३. राष्ट्रीयकृत बॅक पासबुकच्या पहिल्या पानाची ज्यावर खातेदाराचे नांव, पत्ता, खाते क्रमांकाची नोंद आहे त्याची छायांकित प्रत.

४. आधारकार्डाची छायांकित प्रत व आधार कार्ड सिडींग स्लीप.

५. प्रवेश चलनाची झेरॉक्स.

६. जातीच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.

७. पालकांचा मा. तहसिलदारांचा सन २०१९–२० उत्पन्नाचा दाखला.

तरी विद्यार्थ्यांनी नवीन व नूतनीकरण ऑनलाईन भरलेल्या फॉर्मची प्रिंट व आवश्यक कागदपत्रांसहित दि. ३१/१०/२०२० **tcc.schm2021@gmail.com** या मेल आयडीवर स्कॅन करुन पाठवावेत.

याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य